# फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१३८/२०१८ मधील निशाणी क्र.३७ वरील आदेश

## CNR No. MHRT050006662018

(सलमान दादरकर विरुध्द जावेद वली दादरकर)

अर्जदार सलमान जावेद दादरकर याचे वतीने त्याची आई अस्मा तिसेकर हिने फौजदारी प्रक्रिया सहितेचे कलम १२५ नुसार प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत अर्जदाराकरीता अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, त्याचे आई व वडीलांचा विवाह दि.०८.०१.२०१५ रोजी मुस्लीम धर्मशासत्र व रितीरिवाजानुसार झाला. लग्नाच्यावेळी सामनेवाला हा सौदी अरेबीया येथे नोकरीला होता व त्याला रु.१,७५,०००/– एवढा पगार होता व आहे. विवाहानंतर सुरुवातीचे आठ दिवस अर्जदाराची आई ही सामनेवालाकडे नांदली. त्यानंतर ते नेरुळ नवी मुंबई येथे सामनेवालाच्या फ्लॅटमध्ये राहण्यास गेले. तेथे एक महिना राहिल्यानंतर सामनेवाला व त्याचे आई–वडील सौदी अरेबीया येथे निघून गेले व अर्जदाराच्या आईला माहेरी पाठवून दिले. त्यानंतर चार महिन्यांनी अर्जदाराला तिच्या सासूने सौदी अरेबीया येथे नेले. तेथे दोन वर्षे नांदल्यानंतर ती गरोदर राहिली. त्यानंतर दि.२७.०५.२०१७ रोजी सामनेवाला याने अर्जदाराच्या आईला बाळंतपणासाठी तिच्या माहेरी पाठविले. सौदी अरेबिया येथे अर्जदाराच्या आईला अनेक अडचणी येत होत्या. तिथल्या नियमानुसार ती कोठेही जावू शकत नव्हती. अशा परिस्थितीत सामनेवाला हा दुसरे लग्न करण्याचा विचार करू लागला. दि.२७.१०.२०१७ रोजी अर्जदाराच्या आईचे सासू सासरे खेड येथे अर्जदाराची मावशी रुबिना हिच्याकडे आले व त्यांनी अर्जदाराच्या आईला ''तुझ्या नव–याने तलाकचे पेपर पाठविले आहेत'' असे सांगितले. सदर बाब ऐकून अर्जदाराला धक्का बसला व तिने तिचे बाळंतपण होईपर्यंत थांबा अशी त्यांना विनंती केली. मात्र तिचे सासू सासरे निघून गेले. अर्जदाराची आई ही तिच्या माहेरी आली व अर्जदाराचा जन्म झाला. त्या काळात सामनेवाला हा सुट्टीवर भारतात आला होता परंतु तो अर्जदाराला व त्याच्या आईला बघण्यासाठी आला नाही. तसेच त्याने त्यांना घेवून जाण्यासाठी प्रयत्न देखील केला नाही. अर्जदाराच्या आईने सामनेवाला याच्याशी संपर्क केला परंतु सामनेवाला

व त्याच्या आई–वडीलांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. दि.१३.०२.२०१८ रोजी सामनेवाला याने अर्जदाराच्या आईच्या वडीलांच्या बँक खात्यात अर्जदारासाठी रु.३३,८६९/– सहा महिन्याची पोटगी पाठविली. तसेच त्याने कुरिअरद्वारे तलाकची कागदपत्रे पाठविली व सोबतच रु.२१,३५०/– अर्जदाराच्या आईला पाठविले व अर्जदाराच्या आईला तलाक दिल्याचे घोषित केले. अर्जदाराची आई अर्जदारसह माहेरी राहत आहे. सामनेवाला याने त्याच्या व त्याच्या आईसाठी कोणतीही तजवीज केलेली नाही. सामनेवाला हा धनाढय असून त्याचे सौदी अरेबिया येथे तसेच नेरुळ येथे स्वतःचे फ्लॅट आहे तसेच मुंबई येथे त्याने आईच्या नावावरसुध्द फ्लॅट घेतला आहे. याशिवाय त्याच्याकडे खेड येथे घर व शेतजमिन आहे. सामनेवाला याने कोणतेही संयुक्तीक कारण नसताना अर्जदाराचा त्याग केलेला आहे. मुळ अर्ज गुणदोषावर चालवून तो निकाली होणेस विलंब होणार आहे त्यामुळे अर्जदाराने स्वतःकरीता अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रु.२५,०००/– ची मागणी केली आहे.

०३. सामनेवालाकरीता त्याचा मुखत्यार म्हणून वली मोहम्मद इस्माईल दादरकर हे प्रकरणात हजर झाले आहेत व त्यांनी मुखत्यारपत्राची प्रत व मुळ अर्जावर म्हणणे नि.१६ येथे दाखल केले आहे. परंतु त्यांनी प्रस्तुत विचाराधीन अर्जावर कोणतेही म्हणणे सादर केले नाही. तसेच सामनेवालाकडून प्रस्तुत अर्जावर युक्तीवादसुध्दा करण्यात आला नाही. आजही सामनेवाला व त्यांचे मुखत्यार तसेच त्यांचे वकील गैरहजर.

०४. सामनेवाला यांचे मुख्य अर्जाला दिलेल्या उत्तराचे अवलोकन केले असता, त्यांनी अर्जदार व त्याची आई यांच्यासोबत असलेले नातेसंबंध मान्य केले आहेत. तसेच सामनेवाला हा सौदी अरेबियामध्ये नोकरी करतो हे त्यांच्या लेखी उत्तरातून दिसून येते. सामनेवाला यांनी अर्जदाराच्या आईला तलाक दिल्याचेसुध्दा अविवादीत मुद्दा आहे. सामनेवालाने अर्जदाराच्या उदरनिवार्हसाठी दि.१३.०२.२०१८ रोजी रु.३३,८६९/– अर्जदाराच्या आईच्या वडीलांच्या बँक खात्यामध्ये पाठविले होते असे अर्जदाराचे कथन आहे परंतु सामनेवाला याच्या म्हणण्यानुसार त्यांनी अर्जदारास दरमहा रु.५,०००/– व दर दोन महिन्यांनी रु.१०,०००/– माहे जानेवारी २०१८ पासून पाठवित असतो.

सामनेवाला यांच्या लेखी उत्तरातून असे दिसून येते की, अर्जदार हा आजही त्याच्या आईकडेच आहे. प्रस्तुतचा विचाराधीन अर्ज निकाली काढण्यासाठी वरील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. अर्जदाराकरीता विधीज्ञ श्री. एस. एस. शेठ यांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** अर्जदाराच्या अर्जातील कथनांवरून तसेच त्याच्या वतीने करण्यात आलेल्या युक्तीवादावरून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्या प्रत्येक मुद्दयांचा निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या कारणांकरिता मांडत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अर्जदाराची सामनेवालाने सबळ कारणाशिवाय उपेक्षा केली असे सकृत दर्शनी सिध्द होते काय? | ...होकारार्थी. |
| ०२. | अर्जदार सामनेवालाकडून मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | ...अंशतः होकारार्थी. |
| ०३. | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ ते ३ करिताः

**०६.** अर्जदाराची आई व सामनेवाला यांच्यात वैवाहिक नातेसंबंध होते ही बाब अविवादीत आहे. सामनेवाला याने अर्जदाराच्या आईला तलाक दिला याबाबतही कोणताही वाद नाही. तसेच सामनेवाला याने अर्जदाराचे पितृत्वसुध्दा मान्य केले आहे. अर्जदाराने सामनेवालाच्या उत्पन्नाबाबत तसेच दायित्वाबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केलेली नाहीत. परंतु सामनेवाला हा सौदी अरेबिया येथे कंपनीमध्ये नोकरी करतो ही बाब सामनेवाला यांनीच कबूल केलेली आहे. सामनेवाला यांच्या म्हणण्यानुसार अर्जदारास दरमहा रु.५,०००/- व दर दोन महिन्यांनी रु.१०,०००/- माहे जानेवारी २०१८ पासून पाठवित असतो. याबाबत सामनेवाला यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. याउलट अर्जदाराचेच असे कथन आहे की, सामनेवाला याने त्याचेकरीता कोणतीही तजविज केलेली नाही.

**०७.** सामनेवाला याने दुसरे लग्न केले आहे ही बाब अर्जदाराने मुळ अर्जात दुरुस्ती करून अभिलेखावर आणलेली आहे. सामनेवालाच्या म्हणण्यानुसार तो सन २०१८ पासून अर्जदाराला दरमहा रक्कम पाठवितो परंतु प्रस्तुत प्रकरण दाखल झाल्यानंतर आजपावेतो सामनेवाला याने अर्जदाराप्रती जबाबदारी पार पाडली असे दिसून येत नाही. अर्जदार हा अज्ञान असून अर्ज दाखल केला त्यावेळी त्याचे वय केवळ ०७ महिने होते. त्यावरून आजरोजी त्याचे वय साधारण ५ ते ६ वर्षे इतके असेल. तसेच अर्जदार हा आता शिक्षणसुध्दा घेत असेल. सामनेवालाच्या म्हणण्याला पुष्टी मिळण्याकरीता कोणताही पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. परंतु अर्जदाराच्या आईने उलटतपासात सामनेवाला हा मुलासाठी दरमहा तसेच दर दोन महिन्यांनी रु.१०,०००/– पोटगी पाठवित होता हे मान्य केले आहे. परंतु मुळ अर्ज दाखल झाल्यानंतर सामनेवाला याने अर्जदाराची तशीच पुढे तजविज सुरु ठेवली याचा कोणताही पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. केवळ काही रक्कम मुलाकरीता पाठविली म्हणजे त्याची सर्वस्वी जबाबदारी सामनेवाला यांनी पार पाडली असे म्हणता येणार नाही. अर्जदार हा सामनेवाला यांचा मुलगा असून तो वडीलांच्या प्रेमापासून अगदी सुरुवातीपासूनच वंचित राहिलेला आहे. त्यामुळे सामनेवाला याने अर्जदाराची उपेक्षा केली ही बाब सिध्द होते. तसेच अर्जदार हा अज्ञान असल्यामुळे तो स्वतःचा उदरनिवार्ह करण्यास सहाजिकच असमर्थ आहे. अर्जदाराला त्याच्या उदरनिवार्हाकरीता तसेच शिक्षणाकरीता लागणारा खर्च या बाबींचा विचार करता ती जबाबदारी सामनेवाला याच्यावर राहते. सामनेवालाची आर्थिक पार्श्वभुमी व अर्जदाराला येणारा खर्च यांचा संयुक्तीकपणे विचार करता माझ्या मते अर्जदाराला सामनेवाला याच्याकडून दरमहा पोटगी रु.५,०००/– मंजूर करणे न्याय्य व योग्य होईल. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र.२ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र.३ च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

**०१.** अर्ज **(नि.३७)** अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** सामनेवालाला निर्देश देण्यात येतो की, त्यांनी अर्जदाराला दरमहा **रू.५,०००/- (अक्षरी पाच हजार मात्र)** अंतरिम पोटगी म्हणून प्रस्तुत विचाराधीन अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्ज अंतिम निकाली निघेपर्यंत द्यावी.

**०३.** या आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना निःशुल्क देण्यात यावी.

**०४.** उभय पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

SANJAY MOTIRAM CHAVAN

Digitally signed by SANJAY MOTIRAM CHAVAN
Date: 2023.08.02 18:01:27 +0530

दिनांकः- ०२.०८.२०२३

( संजय मो. चव्हाण )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Order below Exh. 37 in Case No. | : | Cri. M.A No.138/2018 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Shri. V. V. Bamane |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Court, Khed. |
| Date of Decision | : | 02.08.2023 |
| Order signed by Presiding Officer on | : | 02.08.2023 |
| Order uploaded on | : | 02.08.2023 |